महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,**
**PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005**


| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX- 020/25536761 |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / | E-MAIL - sscboardpune@gmail.com<br>Website- www.sscboardpune.in |


जा.क्र पुविमं/माध्य शाखा क्र/892
पुणे–411005
दिनांक : /12/2025 06/02/2026

प्रति,

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढीबाबत.

संदर्भ : १. शासनाचे पत्र क्र.परीक्षा–१६२५/प्र.क्र.१३/एस.डी.२, दि.०३/१२/२०२५
२. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–८/४१३९, दि. ०५/१२/२०२५ चे पत्र.
३. क्र.रा.मं/परीक्षा–३/३३८, दिनांक २६/०१/२०२६
४. शासन पत्र क्र.परीक्षा–१६२६/प्र.क्र.०६/एसडी–२, दि.२९/०१/२०२६
५. विभागीय सचिव, मुंबई विभागीय मंडळ यांचे पत्र क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/दि.०२/०२/२०२६ चे पत्र.
६. क्र.रा.मं/परीक्षा–३/४८१, दि. ०४/०२/२०२६ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/०१/२०२६ पर्यंत कळविण्यात आलेली होती.

तथापि संदर्भिय क्र. ०३ च्या पत्रानुसार मुतदवाढीबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता शासनाकडून प्राप्त संदर्भिय क्र.०४ च्या पत्रानुसार फेब्रु/मार्च २०२६ च्या इ. १० वी परीक्षेसाठी आवेदनपत्रे अतिविशेष अतिविलंब शुल्कासह दिनांक ०९/०२/२०२६ पर्यंत मुतदवाढ देण्यात येत आहे.

MBRaut 6.2.26
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

1. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-३/४८१
पुणे-४११००४
दि.- ०४/०२/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे

विषयः— इ. १० वी फेब्रु—मार्च २०२६ परीक्षेच्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढीबाबत

संदर्भः— १. शासन पत्र कमांकः—परीक्षा—१६२५/प्र.क्र.१३/एसडी—२,दि.०३/१२/२०२५
२. या कार्यालयाचे पत्र क.रा.मं/परीक्षा—८/४१३९, दि. ०५/१२/२०२५
३.क.रा.मं./परीक्षा—३/३३८ दि. २६/०१/२०२६ रोजीचे पत्र
४.शासनाचे पत्र क. परीक्षा—१६२६/प्र.क्र.०६/एस डी—२ दि. २९/०१/२०२६
५. विभागीय सचिव, मुंबई विभागीय मंडळ यांचे पत्र क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/दि.०२/०२/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय क. १ च्या शासन पत्राच्या अनुषंगाने फेब्रु—मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची अंतिम मुदत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी ) परीक्षेसाठी दि.३०/०१/२०२६ पर्यंत विभागीय मंडळांना कळविण्यात आलेली होती.

इ. १० वी परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्याची मुदत दि.३०/०१/२०२६ रोजी संपलेली आहे. याबाबत सदर आवेदनपत्र भरणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत विभागीय मंडळ कार्यालयांतर्गत अनेक शाळांनी मंडळाकडे विनंती केली आहे.

त्यानुसार संदर्भिय क्र.३ च्या पत्रानुसार मुदतवाढीबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता याबाबत शासनाकडून प्राप्त संदर्भिय क. ४ च्या पत्रानुसार फेब्रु—मार्च २०२६ च्या इ. १० वी परीक्षेसाठी आवेदनपत्रे अतिविशेष अतिविलंब शुल्कासह दि.०९/०२/२०२६ पर्यंत स्विकारण्यात यावीत.

सदर बाब आपल्या स्तरावरुन विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतीत सर्व शाळांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे—०४

प्रत माहितीस्तव सादर,
१.मा. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२.मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, पुणे

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी
१.व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे—४
२.लेखा शाखा, राज्य मंडळ, पुणे—४

G:\Pariksha-3.docx-7